संत सोहिरोबानाथांचे विचार आजही उपयुक्त

वसंत कोळंबकर : आंबिये महाविद्यालयात संत सोहिरोबानाथांची जयंती उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

विर्नोडा : सुप्रसिद्ध व्याख्याते वसंत कोळंबकर यांच्यासोबत महाविद्यालयाचे विद्यार्थी व प्राध्यापक वर्ग.

विर्नोडा, दि. १५ : संत सोहिरोबानांचा संपूर्ण जीवनपट आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असून त्यांच्या साहित्यकृतींतील ज्ञान आजच्या आधुनिक युगातही उपयुक्त आहे, असे प्रतिपादन संत सोहिरोबानाथांच्या साहित्याचे अभ्यासक, सुप्रसिद्ध व्याख्याते वसंत कोळंबकर यांनी केले.

आंबिये महाविद्यालयातील मराठी विभाग आणि महाविद्यालयाचे भाषा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या गोमंतकातील संत कवी, संत सोहिरोबानाथ आंबिये यांच्या जयंती कार्यक्रमात ते बोलत होते. आधुनिक समाजात संत सोहिरोबानाथ आंबिये यांच्या शिकवणीची प्रासंगिकता' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. प्रविणा केरकर, मराठी विभाग प्रमुख विष्णू वेटे, वाणिज्य विभाग प्रमुख विरेंद्र आमोणकर, भाषा केंद्राचे समन्वयक आनंद कोळंबकर, इतर प्राध्यापक वर्ग व विद्यार्थीवर्ग उपस्थित होते.

कार्यशाळेची सुरुवात संत सोहिरोबानाथांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.कार्यशाळेचे प्रास्ताविक व स्वागत भाषा केंद्राचे समन्वयक आनंद कोळंबकर यांनी केले. पाहुण्यांची ओळख तृतीयवर्ष, मराठी विभागाची विद्यार्थिनी अनिशा कुबल हीने करून दिली. सूत्रसंचालन तृतीयवर्ष, मराठी विभागाचा विद्यार्थी भिसे गवस यांने केले. द्वितीयवर्ष कला शाखेची विद्यार्थिनी हर्षा कांबळे यांनी आभार मानले.

संत सोहिरोबानाथांचा आदर्श घ्यावा: प्राचार्य केरकर

संत सोहिरोबानाथांसारख्या थोर व्यक्तींचा आपण आदर्श घेऊन त्यांनी दाखविलेल्या मार्गाचा अवलंब करत एक उत्तम नागरिक झाले पाहिजे, असे प्राचार्या डॉ प्रवीणा केरकर यांनी सांगितले.

पान १ वरून

गोव्याच्या मंत्री, आमदारांची त्रिवेणी संगमावर 'डुबकी'

करण्यात येईल असे सांगताना मुख्यमंत्री म्हणाले की, आमच्यासाठी ही एक पर्वणी आहे. आमच्यासाठी आज हा योग येतो आहे ही खूप चांगली गोष्ट आहे, माझे मंत्रिमंडळातील सहकारी, आमदार आणि अन्य काही जण पवित्र स्नानासाठी जात आहोत.

१४४ वर्षांनी येणारा हा योग आमच्या आयुष्यात परत येऊ शकत नाही असे सांगताना वास्कोचे आमदार दाजी साळकर म्हणाले की , प्रयागराज मध्ये अतिशय उत्तम व्यवस्था आहे , या पवित्र सोहळ्याचा लाभ गोव्यातल्याही अनेक जणांना घेण्याची संधी मिळावी, अशी मागणी आम्ही मुख्यमंत्र्यांकडे केली होती.

या दौऱ्यात सहभागी झालेले मंत्री माविन गुदिन्हो यांनी देखील या त्रिवेणी संगमात डुबकी मारली. जगातल्या सर्व धर्मियांना एकाच ठिकाणी खेचून आणण्याची प्रचंड दैवी शक्ती या महाकुंभात आहे असे सांगताना मंत्री माविन गुदिन्हो यांनी प्रयागराज मधल्या त्रिवेणी संगमावरचे पवित्र स्नान का महत्त्वाचे आहे, असे सांगितले. अनेक धर्म असले तरी देव शेवटी एकच आहे, महाकुंभमध्ये असलेली दैवी शक्ती एवढी जबरदस्त आहे की, या ठिकाणी जाऊन स्नान केले की जी काही वाईट कर्मे आहेत ती नाहीशी होतात अशी लोकांची श्रद्धा आहे आणि त्याच श्रद्धेतून आम्ही या सोहळ्यात सहभागी झालो . अशा भावना मंत्री गुदिन्हो यांनी यावेळी व्यक्त केल्या.

गोव्याच्या या खास पाहुण्यांची खास व्यवस्था उत्तर प्रदेश सरकारने केली होती. त्रिवेणी संगमावर ने आण करण्याची सर्व काळजी घेण्यात आली होती . मुख्यमंत्री कार्यालयाने या विशेष दौऱ्याचे आयोजन केल्याची सूत्रांची माहिती असून या दौऱ्यात सहभागी होण्यासाठी काही आमदारांनी आपल्या मतदारसंघातल्या आणि आपल्या खास मर्जीतल्या प्रभावशाली व्यक्तींना संधी दिली असल्याचीही माहिती आहे.

कमळेश्वर प्राथमिक विद्यालयात मातृ पितृ दिन उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ विद्यार्थ्यांनी केले मात्या पित्यांचे पूजन घेतले आशीर्वाद

पेडणे, दि. १५ : पेठेचा वाडा कोरगाव येथील श्री कमळेश्वर प्राथमिक विद्यालयात मातृ पितृ पूजन उत्साहात करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्री कमळेश्वर उच्च माध्यमिक विद्यालयाचे अध्यापक विठोबा बगळी उपस्थित होते. याशिवाय व्यासपीठावर श्री कमळेश्वर हायस्कूलचे मुख्याध्यापक आत्माजी नाईक, पालक शिक्षक संघाच्या अध्यक्ष धनश्री केरकर आदी उपस्थित होते.

यावेळी श्री. बगळी यांनी सांगितले की, भारतीय संस्कृती मध्ये माता पित्याना देवतुल्य मानले जाते अशा जगातील सर्वश्रेष्ठ संस्कृतीचे रक्षण करून ती वाढीस लावणे आपले प्रत्येकाचे कर्तव्य आहे लहान पणी आपल्या खांद्याचा आधार देणाऱ्या वृद्ध मात्या पित्याचा आपण आधार होण्याची गरज असल्याचे सांगितले.केवळ आपल्या देशात असलेली ही संस्कृती सांभाळताना वृद्धाश्रम वाढीस लागणार नाही याची दक्षता आपल्याला घ्यायला हवी.

मुख्याध्यापक आत्माजी नाईक यांनीही भारतीय संस्कृती मध्ये माता पित्यांना असलेला सन्मान कायम राखताना आपल्या मुलावरही योग्य संस्कार करण्याची गरज आहे तरच मोठेपणी आपला ही मुले सन्मानाने सांभाळ करतील, असे सांगितले.

विधी केरकर हिने मातृ पितृ दिनाची माहिती दिली.पूर्व प्राथमिक विद्यालयाच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी बाबा या विषयावर कविता सादर केल्या.

चोपडे जंक्शन ते खिंडपर्यंतच्या रस्त्याच्या डांबरीकरणाचा शुभारंभ

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. १५ : चोपडे जंक्शन ते मोरजी खिंड पर्यंतच्या रस्त्यावर एकूण तीन कोटी रुपये खर्च करून त्यात रस्ता वाइंडनिग आणि हॉट मिक्स डांबरीकरण केले जाणार आहे. या कामाचा शुभारंभ आमदार जीत आरोलकर यांच्या हस्ते चोपडे जंक्शनवर नुकताच करण्यात आला.

यावेळी आगरवाडा सरपंच हेमंत चोपडेकर, मोरजी सरपंच पवन मोरजे, माजी सरपंच मुकेश गडेकर, माजी सरपंच सचिन राऊत, माजी सरपंच अँथनी फर्नांडिस, पंचसदस्य भगीरथ गावकर, अभियंते गावस, अनंत शेटगावकर, प्राची भिवशेट, वंदना शेटगावकर, प्रताप भिवशेट आदी उपस्थित होते.

आमदार आरोलकर यांनी सांगितले की, चोपडे जंक्शन ते खिंड मोरजीपर्यंतच्या रस्त्याचे हॉटमिक्स डांबरीकरण आणि रस्त्याच्या बाजूला वाइंडनिग करत असताना स्थानिक नागरिकांनी सहकार्य करण्याची गरज आहे. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी या रस्त्यांची जाणीव होती. म्हणून लगेच काम सुरू करण्याच्या सूचना केल्या. टेंडरही मंजूर होऊन कामाला सुरुवात केल्याचे आमदार आरोलकर म्हणाले.

चोपडे ते केरी पर्यंतच्या दोन्ही रस्त्याच्या बाजूने जलवाहिनी टाकणार

रस्त्याच्या बाजूने एकाच बाजूने जलवाहिनी टाकली जाते. त्यामुळे दुसऱ्याच्या रस्त्याच्या पलीकडे असलेल्या घरांना जलवाहिनी पाण्याचे कनेक्शन नेताना रस्ते फोडण्याची वेळ येते. त्यामुळे अनेक रस्ते खड्डेमय होतात. आगरवाडा ते केरी पर्यंतच्या दोन्ही रस्त्याच्या बाजूने जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू करण्यात येणार आहे आणि त्यावर नऊ कोटी रुपये खर्च केले, अशी माहिती आमदार जीत आरोलकर यांनी दिली.

यावेळी आगरवाडा सरपंच हेमंत चोपडेकर यांनी सांगितले की, चोपडे जंक्शन ते मोरजीपर्यंतच्या रस्त्याकडे मागच्या तेरा वर्षापासून हॉटमिक्स डांबरीकरण करण्याचे काम केले होते. त्यामुळे अनेक प्रवाशांना वाहन चालकांना या रस्त्यावरून वाहने चालवताना अडचणी निर्माण होत होत्या. याची दखल घेत आमदार आरोलकर यांनी सरकार दरबारी प्रयत्न करून या रस्त्याच्या हॉटमिक्स डांबरीकरणाचा कामाचा शुभारंभ केल्यामुळे आता नागरिक समाधान व्यक्त करत आहेत.

मोरजी सरपंच पवन मोरजे म्हणाले की या रस्त्याची स्थिती भयानक झाली होती. पावसाळ्यात अनेकवेळा या रस्त्यावर पाणी साचून नागरिकांना वाहनचालकांना त्रास होत होता. याची दखल आता सरकारने घेऊन स्थानिक आमदार जीत आरोलकर यांनी प्रयत्न करून या रस्त्याचे हॉटमिक्स डांबरीकरण करण्याचा कामाचा शुभारंभ केल्यामुळे या रस्त्यावरील समस्या सुटतील.

शिवोलीतील शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे १७ मार्चला अनावरण

टीम दैनिक हेराल्ड

शिवोली, दि. १५ : शिवोलीतील समर्थन संघटणा तसेच सामाजिक निधीद्वारे उभारण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण आता १७ मार्चला दुपारी होणार असल्याची माहिती येथील स्वामी समर्थ मठाचे संस्थापक तसेच अध्यक्ष निलेश वेर्णेकर यांनी दिली.

मठाच्या सभागृहात शुक्रवारी घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेतून वेर्णेकर यांनी ही माहिती दिली. दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळ्यासाठी येथील थियेटर जंक्शन परिसरात उभारण्यात येत असलेल्या चौथर्याचे (फाउंडेशन) काम लांबणीवर गेल्याने शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा अनावरण कार्यक्रमात बदल करण्यात आल्याचे वेर्णेकर यांनी यावेळी सांगितले. दरम्यान , १७ मार्चला छत्रपती शिवाजी महाराज जन्मतिथी असल्याने सर्वसंमतीने हा निर्णय घेण्यात आलेला असून त्यादिवशी अनावरण कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी कोल्हापूरहून विशेष ढोलताशे आणि न्रुत्य पथकांना आमंत्रित करण्यात आल्याची माहिती समर्थन संघटणेचे प्रेमानंद आरोलकर तसेच नितीन आगरवाडेकर यांनी यावेळी दिली. गोवा राज्य तसेच महाराष्ट्र राज्यातील अनेक राजकीय तसेच सामाजिक क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित राहाणार असल्याने शिवप्रेमींनी मोठ्या प्रमाणात शिवोलीत उपस्थित राहून शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा अनावरण कार्यक्रमाची शोभा वाढविण्यासाची मागणी शेवटी समर्थन संघटणेचे सचिव यदुवीर सिमेपुरुषकर यांनी दिली. पत्रकार परिषदेत प्रणव परब, दीपक आगरवाडेकर, कांचन पेडणेकर आदींची उपस्थिती होती.

शिक्षक हा सर्वांना घडवणारा प्रमुख घटक : शिरोडकर

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ तांबोसे- मोप सरकारी प्राथमिक विद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहात

मोप : स्नेहसंमेलनाचे उद्घाटन करताना कृष्णा पालयेकर. बाजूला निवृत्ती शिरोडकर, मुख्याध्यापिका स्मिता आंबेकर व इतर

पेडणे, दि. १५ : संस्कारमय जीवन घडवण्याचे काम शिक्षक निःस्वार्थी भावनेने करत असतो. प्रत्येकाच्या जीवनाला नवे वळण देण्याचे काम संस्कारमय धडे प्रत्येक व्यक्तीला घडवण्याचे काम हा शिक्षक करत असून शिक्षक हा प्रमुख घटक मानला जातो. म्हणूनच आपण शिक्षकाला कधीही विसरून जाऊ नका, असे आवाहन पत्रकार निवृत्ती शिरोडकर यांनी केले. तांबोसे मोप येथील सरकारी प्राथमिक विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन बक्षीस वितरण कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे या नात्याने ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर नवचेतना युवक संघाचे अध्यक्ष कृष्णा पालयेकर, तांबोसे सरकारी प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका स्मिता आंबेकर, शाळा व्यवस्थापन समितीच्या शुभदा गवंडी, पालक शिक्षक संघाच्या अध्यक्ष सिया धुरी, बालवाडी शिक्षिका सुखदा गवंडी उपस्थित होते.

श्री. शिरोडकर म्हणाले की, विद्यार्थ्यांनी जे शिक्षक शाळेमध्ये शिकवत असतात ते तो अभ्यास आत्मसात करून आपल्याला देशाचे चांगले नागरिक बनवायचे आहे. आई-वडिलांबरोबर शिक्षकांना आपण मोठे झाल्यानंतरही विसरू नका. तुम्हा आम्हा सर्वांना घडवण्याचे कार्य हे शिक्षक करत असतो. याचे भान ठेवण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

कृष्णा पालयेकर यांनी सांगितले की, शिक्षण क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांनी प्रगती साधत असताना इतर क्षेत्रातही आघाडी घ्यावी. यश हे सदोदित आपल्या हाती आहे. त्यासाठी शिक्षक जे ज्ञान आपल्याला देत असतात. ते आत्मसात करत असताना प्रत्येक विद्यार्थ्यांनी आत्मचिंतन करावे आणि आपली शिक्षण क्षेत्रात प्रगती साधावी.

यावेळी विद्यार्थ्यांनी विविधरंगी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. दीक्षिता आसोलकर यांनी आभार मानले.

स्वागत व प्रास्ताविक स्मिता आंबेकर यांनी केले. सूत्रसंचालन विद्यार्थिनी मेघा आसोलकर यांनी केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते शाळेमध्ये घेतलेल्या विविध स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली.

IN THE COURT OF JOINT MAMLATDAR VI OF BARDEZ TALUKA, MAPUSA GOA

Case No. JM-VI / TNC / PUR / 18-C / Nagoa / 11 / 2023

1. Mrs. Vilasini Vishnu Madkaikar, Widow of late Vishnu Madkaikar, R/o H. No. B/152, Reis Magos, Verem, Betim, Bardez, Goa .....Applicant

V/s

1. Mr. Pascoal J. Fernandes 2. Merces Mascarenhas, Both r/o Diaswaddo, Nagoa, Behind Merci Saibin Church, Arpora, Bardez, Goa ....Opponents

PUBLIC NOTICE

To The Opponents

Whereas the applicant in the above case has made an application to pay the purchase price of Rs. 680/- (Rupees Six Hundred Eighty only) towards the purchase of the property bearing Sy. No. 4/3 of Village Nagoa under the Goa Daman & Diu Agricultural Tenancy Act 1964.

Whereas vide Judgement and Order dated 22.08.2024 passed in above case, the applicant is directed to pay the purchase price of Rs. 680/- (Rupees Six Hundred Eighty Only) to the opponents.

And whereas the applicant vide his application dated 10/02/2025 has submitted that the notices issued to the opponent for collecting purchase price was returned unserved and has therefore prayed for publication of notice by way of substitute service.

And whereas in my opinion this is fit case for publication under order V Rules 20(1)(A) of C.P.C. 1908 to publish the notice through local newspaper for vide publicity.

Now therefore, in terms of provision of the order V Rule 20(1)(A) for C.P.C. 1908, above opponents or their legal heirs are hereby called upon to appear in this court on **11.03.2025 at 3.00 pm** to answer the claim of the applicant. Take notice that in default of your appearance as aforesaid on the above date and time, the said application will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of this Court on this 10th day of February 2025.

Sd/- **Saiesh S. Naik**
Joint Mamlatdar VI of Bardez Taluka
Mapusa, Goa
Seal

CHANGE OF NAME

I, **Blasco Miguel Lino Monsorato** resident of Asmita Jyoti CHS, D-7/42, Charkop Naka Junction, Marve Road, Malad West, Mumbai, 400095 Maharashtra, India would like to change to H. No: 107, Antil Peth, Bicholim, North Goa 403504 would like to change my name, from **Blasco Michael Monsorate** to **Blasco Miguel Lino Monsorato**, my **father name** from **Pedro Anthonio Monsorate** to **Pedro Antonio Monsorato**, My Mother name from **Clara Candida Monsorate** to **Clara Roquinha Candida Pinto**, My Spouce name from Nathaline Monsorate to Nathaline Monsorato.

Hereinafter in all my future dealings and documents it would be known as **Blasco Miguel Lino Monsorato**

Sd/-
Blasco Miguel Lino Monsorato

केनरा बैंक Canara Bank
सिंडिकेट Syndicate

शाखा कार्यालय : मडगाव (314)
ईमेल आयडी : cb0314@canarabank.com
दूर.क्र. : 7774005713

कब्जा सूचना {कलम 13(4)}

(स्थावर मालमत्तेसाठी)

ज्याअर्थी,

खाली सही करणारा सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 (2002 चा 54 वा) खाली कॅनरा बँकेचा प्राधिकृत अधिकारी आहे आणि सदर कायद्याच्या कलम 13(12) सह सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 च्या नियम ३ खाली त्यास प्रदान झालेल्या अधिकारांचा वापर करून त्याने सदर मागणी सूचना मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत सदर सूचनेत दिलेल्या **रु. 18,82,999.47 (रु. अठरा लाख ब्याऐंशी हजार नऊशे नव्व्याण्णव व पैसे सत्तेचाळीस फक्त)** या रकमेची परतफेड करावी, अशी मागणी सूचना कर्जदार **श्री. स्वेतन संतोष सिमीपुरषकर (कर्जदार) व श्रीमती शांती स्वेतन सिमीपुरुषकर (कर्जदार)** यांना **16/11/2024** रोजी पाठवली होती.

कर्जदारांस या रकमेची परतफेड करण्यात अपयश आल्याने कर्जदार व ताम लोकांना याद्वारे नोटीस देण्यात येते की, खाली सही करणाऱ्याने सदर कायद्याच्या कलम 13 (4) सह सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 च्या नियम 8 व 9 खाली त्यास तिला प्रदान झालेल्या अधिकारांचा वापर करून येथे खाली वर्णिलेल्या मालमत्तेचा **ताबा वर्ष 2025 च्या जानेवारीतील 11 व्या दिवशी** घेतला आहे.

खासकरून कर्जदार आणि तमाम लोकांना इशारा देण्यात येतो की त्यांनी या मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये आणि त्यांनी केलेला असा कोणताही व्यवहार कॅनरा बँकेस **दि. 16/01/2025** रोजी देय असलेल्या रु. **18,23,287.47/- (रु. अठरा लाख तेवीस हजार दोनशे सत्त्याऐंशी व पैसे सत्तेचाळीस फक्त)** आणि त्यावर साठलेल्या व्याजासहितच्या रकमेच्या भारास लागू होईल.

सदर मालमत्ता पुन्हा मिळवण्यासाठी उपलब्ध वेळेसंबंधी सदर कायद्याच्या कलम 13 (8) कडे कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

घोगळ, मडगाव-गोवा येथे असलेल्या 63.75 चौ.मी. क्षेत्रफळाच्या पीटी शीट क्र. 126 च्या चलता क्र. 1, 3 व 145 खाली सर्वेक्षित क्र. ईडब्ल्यूएस-739 असलेली सदनिका.

सदर सदनिका क्र. ईडब्ल्यूएस-739 च्या **चतु:सीमा : पूर्वेस** : क्र. ईडब्ल्यूएस 742, **पश्चिमेस** : रस्ता, **उत्तरेस** : क्र. ईडब्ल्यूएस738, **दक्षिणेस** : क्र. ईडब्ल्यूएस743.

दिनांक :11/02/2025
ठिकाण : मडगाव

सही/-
प्राधिकृत अधिकारी
कॅनरा बँक

OFFICE OF THE VILLAGE PANCHAYAT RIVONA
Rivona, Sanguem - Goa
Ref No. VPR/San/GS Notice/2024-25/ 2085
Date:14/02/2025

GRAM SABHA MEETING NOTICE

All the Gram Sabha Members of Village Panchayat Rivona are hereby informed that the ordinary Gram Sabha Meeting of the said Panchayat will be held at V.K.S.S. Society hall Rivona on **23/02/2025 at 9.30 A.M** to transact the following business on the Agenda:

AGENDA

1. To read and confirm the proceeding of Last Gram sabha.
2. To place and discuss on the proposals received from Gramsabha Members in connection with development works.
3. To receive and approve applications from the beneficiaries under various Govt. Schemes.
4. To Place and discuss the correspondence received from any Govt Department If any.
5. To place and approve Budget for financial year 2025-26.
6. Identification of site for MRF shed in V.P. Rivona Jurisdiction.

Sd/- Sarpanch
Village Panchayat Rivona
Seal

N B. In case there be no Quorum as required under Section 5(6) of the Goa Panchayat Raj Act 1994, the same shall stand adjourned for half an hour after fifteen minutes from the appointed time for the original meeting, shall be held soon thereafter to transact the business on the agenda of the appointed meeting irrespective of the Quorum.

If any member of the Gram Sabha desires to submit his / her proposal for the consideration of the Gram Sabha he/she may do so in writing, so as to reach the undersigned four days before the date of the Gram sabha meeting.

करमलघाटाच्या रुंदीकरणाला विरोध करणाऱ्या लोकांविरुद्ध लढा उभारणार

नगरसेवक धिरज नाईक : रुंदीकरण त्वरित होणे आवश्यक

■ टीम दैनिक हेराल्ड

काणकोण, दि. १४ : करमलघाटाच्या रुंदीकरणाला विरोध करणाऱ्या लोकांविरुद्ध लढा उभारण्यात येईल. त्यादृष्टीने काणकोण तालुक्यातील विविध पक्षांच्या नेत्यांशी तसेच सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या ज्येष्ठ नागरिक, समाज कार्यकर्ते, युवा कार्यकर्ते यांच्याशी चर्चा चालू असल्याची माहिती काणकोण पालिकेचे नगरसेवक धिरज नाईक गावकर यांनी दिली. करमलघाटावरील राष्ट्रीय महामार्गा क्र. ६६ (पूर्वीचे राष्ट्रीय महामार्गा क्र १७) च्या प्रस्तावित रुंदीकरणाला काही घटक विरोध करीत आहेत. या प्रकाराचा नगरसेवक श्री. नाईक गावकर यांनी निषेध केला आहे.

माजी नगराध्यक्ष राजेंद्र देसाई यांनी सांगितले की, आजपर्यंत करमलघाटात अनेक अपघात होऊन कित्येक लोक मृत्युमुखी पडले आहेत. करमलघाटातील धोकादायक वळणामुळे व अरुंद रस्त्यामुळे हे अपघात झालेले आहेत. त्यामुळे या रस्त्याचे रुंदीकरण त्वरित करणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले.

काणकोणचे एक निवृत्त मुख्याध्यापक शांताजी नाईक गावकर यांनी कोकण रेल्वेला काही लोकांनी विरोध केला होता, असे सांगितले . पण काणकोणकार गप्प बसले नाहीत. कोकण रेल्वेसाठी काणकोण तालुक्यातील नागरिकांनी मोठे आंदोलन उभे केले. पोलिसांकडून अटकही करून घेतली याची त्यांनी आठवण करून दिली. करमलघाट रस्त्याचे रुंदीकरण करण्यासाठी प्रसंगी आंदोलन करण्याची पाळी आली तर ते करण्याची तयारी असल्याचे शांताजी नाईक गावकर यांनी सांगितले.

बोगद्याचा पर्याय निवडण्याची मागणी काही लोक करीत आहेत. अशाप्रकारची मागणी करून, रस्ता रुंदीकरणाला खो घालण्याचा हा डाव असल्याचे श्रीस्थळ पंचायतीचे उपसरपंच शिवा देशमुख यांनी सांगितले. करमलघाटाच्या रुंदीकरणाला विरोध करणाऱ्या लोकांना श्रीस्थळ पंचायत क्षेत्रातील लोक कधीच पाठिंबा देणार नाही, असे ते म्हणाले.

करमलघाट हा पश्चिमघाटाचा एक अविभाज्य भाग आहे. जैवविविधतेचे केंद्र आहे. या सगळ्या गोष्टी खऱ्या असल्या तरी मानवी जीवनही महत्त्वाचे आहे याचा विसर पर्यावरणप्रेमींना पडला आहे का? असा प्रश्न श्रीस्थळ पंचायतीचे माजी उपसरपंच किसन नाईक गावकर, माजी पंच अमर नाईक गावकर यांनी केला आहे. विकास हा महत्त्वाचा आहे. पर्यावरणाचे संवर्धन करूनच विकास केला जातो. पण ऊठसूट पर्यावरण प्रेमीचा विरोध सहन केला जाणार नाही असे येथील नागरिकांचे मत आहे. केंद्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी या प्रकरणी लक्ष घालण्याची मागणी काणकोण तालुक्यातील नागरिकांनी केली आहे.